Leading International Marathi News Daily

शनिवार, ९ मे २००९

आई म्हणजे ..
वाळवणी खाद्ययात्रा
आनंद की आसूया?
मूल्य आणि मोल
गुरुब्रह्मा
विज्ञानमयी
अनोखे मतृत्व
आईची ती आई झाली
भैरवी
हिरवळ
गुपितं सांगण्याचा कट्टा
प्रतिसाद
लग्नाच्या आहेराची गोष्ट!
नोट्स टू इच अदर!
आधारवड होण्यासाठी..
ऐन ग्रीष्मात चांदण्या रात्री
मातृसती
निळ्या डोंगरांचे प्रसन्न गाव
त्रिपुरसुंदरी

Advertise with us



प्रिया दविदार

प्रिया दविदारला निसर्गप्रेमाचा वारसा पित्याकडूनच मिळाला. केवळ हौसेखातर ते वन्यजीवांना कॅमेराबद्ध करीत. बालपणापासूनच तिला भोवतालच्या जगाविषयी कुतूहल आणि ते जाणून घेण्याची ओढ होती. विशेष म्हणजे तिचा पीएच.डी.चा अभ्यास डॉ. सलीम अलींच्या मार्गदर्शनाखाली झाला. ते केवळ पक्षीतज्ज्ञच नव्हते, तर अत्यंत हुशार, तत्त्वनिष्ठ आणि न्यायी व्यक्ती होते. ज्या काळात पर्यावरण क्षेत्रात स्त्रिया अभावानेच आढळत, त्या काळात तिने पर्यावरणतज्ज्ञ होण्याचे ठरविले. तिचे निसर्गप्रेम पाहून सलीम अलींनीही तिला सदैव प्रोत्साहन दिले.
मुंबईत पीएच.डी. केल्यानंतर प्रिया अमेरिकेत गेली. स्मिथसोनियन आणि हार्वर्डसारख्या ख्यातनाम विद्यापीठांमध्ये तिने सात वर्षे

पोस्ट-डॉक्टरल फेलो म्हणून काम केलं. अमेरिकेत सुप्रसिद्ध तज्ज्ञांच्या हाताखाली काम करण्याची संधी तिला मिळाली. येथेच तिला शास्त्रीय संशोधनात मार्गदर्शकांचे महत्त्व कळले.
भारतात परतल्यानंतर मात्र प्रियाचा मार्ग तितकाचा सोपा नव्हता. जातिव्यवस्थेचा मोठा अडसर तिच्यासमोर होता. स्त्रीकडे बघण्याचा एक खास दृष्टिकोन, यामुळे तिचा मार्ग कठीणच होता. रूढीप्रिय दक्षिण भारतात तर तुमची केशभूषा, वेशभूषा, बोलण्या-वागण्याची पद्धत चारचौघींसारखी नसली तर संपलेच सगळे! अशा वातावरणातही प्रिया खंबीरपणे उभी राहिली आणि तिने आपल्या क्षेत्रात उत्तम यश मिळविले. तिला आंतरराष्ट्रीय पातळीवरही मान्यता मिळाली.
पर्यावरणासंदर्भात काम करायचं म्हणजे प्रयोगशाळेची किंवा अन्य सुसज्ज यंत्रणेची आवश्यकता नव्हती. तिने गावा-गावांमध्ये जाऊन पर्यावरणावर काम केलं. या कामात तिला कुटुंबाकडूनही उत्तम पाठिंबा मिळाला. तिच्या कामात तिला चांगले विद्यार्थी मिळाले. तिने अनेक चांगले विद्यार्थी घडविले. विशेष म्हणजे त्यात मुलींची संख्या जास्त आहे. पर्यावरणतज्ज्ञांना खेड्यापाड्यांत, रानावनात काम करावे लागते. प्रियाने हे आव्हानही समर्थपणे पेलले. उलट खेड्यातील लोकांचा स्त्री-पर्यावरणतज्ज्ञ जास्त जवळची वाटते असा प्रियाचा अनुभव आहे.
आपल्या देशात आज पर्यावरणाचा व जैविक विविधतेचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. अशा वेळी तरुण अभ्यासकांनी पुढे यावे व हे चित्र पालटून टाकावे, तरच आपले भविष्य चांगले आहे, असे तिचे म्हणणे आहे.
ती सध्या पाँडिचेरी युनिव्हर्सिटीत, इकॉलॉजी अँड एन्व्हायर्नमेंटल सायन्सेस (सजीव आणि निर्जीव यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास) या विभागात कार्यरत आहे. ती स्मिथसोनियन इन्स्टिट्यूटची सिनियर फेलो आहे. असोसिएशन फॉर ट्रॉपिकल बायोलॉजी अँड कॉन्झर्वेशन (विषुववृत्तीय प्राणिजीवन आणि त्यांचे संरक्षण) या संस्थेची ती अध्यक्ष आहे.



सुलभा कुळकर्णी

जर स्त्रियांना शास्त्रीय संशोधनात पाय रोवून उभं राहायचं असेल, तर मुंगीसारखं काम करावं, धीटपणे वागावं, मात्र अंतर्यामी स्त्रीच रहावं. संशोधन क्षेत्रात विशेषत: पदार्थविज्ञानात काही काम करू पाहणाऱ्या स्त्रीने हाच संदेश मनात ठेवावा, असं सुलभा कुळकर्णी हिचं मत आहे. नुसतं शास्त्रज्ञ म्हणवून घ्यायलासुद्धा स्त्रीला पुरुषापेक्षा कितीतरी पट अधिक काम करावं लागतं, असाच तिचा अनुभव. संशोधन म्हणजे चोवीस तासांची बौद्धिक आणि मानसिक निष्ठा! त्याचबरोबर स्त्रीला तर कौटुंबिक जबाबदारीही सांभाळावी लागते. महाराष्ट्रात वाईसारख्या ठिकाणी वाढलेल्या सुलभा कुळकर्णी हिने ही दोन्ही आव्हानं समर्थपणे पेलली. ज्ञानपिपासू वृत्ती, संशोधनाची आवड, जिद्द असे अनेक गुण तिच्यात आहेत. वाईच्या शाळेत भाषा, इतिहास, भूगोल या विषयांकडे तिचा कल होता. पण बापट आणि गुणे या शिक्षकांमुळे तिला गणिताची गोडी लागली. पुढे पुण्यात फर्गसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर भौतिकशास्त्र हा विषय तिने निवडला, तो त्यात गणिताला प्राधान्य असते म्हणून. पुढे पुणे युनिव्हर्सिटीत फिजिक्स शाखेचे प्रमुख एस. आर. भिडये यांनी तिला फिजिक्सची गोडी लावली.
सुलभाने पीएच.डी. प्रोजेक्टसाठी एक स्वयंचलित स्पेट्रोमीटर बनवला. स्पेट्रोमीटर अगदी आराखडा काढण्यापासून स्टँडवर घालता-काढण्याजोगी एक्स-रे ट्यूब ते सर्किट बोर्ड तिने तयार केले. हे यंत्र व्यवस्थित चालल्यामुळे तिचा आत्मविश्वास दुणावला. तिचे पुण्यातील गुरू भिडये आणि निगवेकर यांनी तिला पुढील (पोस्ट डॉक्टरल) अभ्यासासाठी जर्मनीला जाण्याचे सुचविले. विशेष म्हणजे जर्मनीत मेकोलॅड लॅब, म्युनिच येथे २५ जणांच्या अभ्यासगटांत ती एकमेव स्त्री होती.
१९७८ साली ती पुण्यात फॅकल्टी मेंबर म्हणून परतली. तिने तेथे सरफेस सायन्स प्रयोगशाळा सुरू केली. तेव्हा ई-मेलची किंवा फॅक्सचीही सुविधा नव्हती. इतरांशी संपर्क साधणे कठीणच होते. एक स्त्री म्हणून हा काळ तिच्या जीवनातील अत्यंत कठीण, परीक्षेचा ठरला. पण ती भक्कमपणे पाय रोवून उभी राहिली.
आज ती अनंत अडचणींना तोंड देत मोठ्या आत्मविश्वासाने तिच्या क्षेत्रात यशशिखरावर आहे.

वसुमती धुरू